**वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ चा शपथेवर पुरावा,**
मी शपथेवर सत्यकथन करतो ते येणे प्रमाणे की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | सतिष शांतीनाथ झांबरे, |
| वय | : | ४१ वर्षे, |
| धंदा | : | शाखा अधिकारी, बँक ऑफ बडोदा राहुरी, |
| राहाणार | : | राहुरी, ता.राहुरी, जि.अहमदनगर, |

**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम. डी. काकाणी यांचेद्वारे.**

सदरील दावा चालविण्याकरिता दिनांक १४/०७/२०२५ रोजी ब्रान्च मॅनेजर यांनी माझ्या नावाचे अधिकार पत्र दिलेले आहे. त्यावर त्यांची सही असून बँकेचा शिक्का आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन ते **नि.क्र.१३** वर आहे. आता मला प्रतिवादीचा कर्ज मागणी अर्ज, अनुसुची, डिमांड प्रोमेसरी नोट, डीड ऑफ हायपोथिकेशन, लेटर ऑफ कन्टीन्युइंग सेक्युरीटी, जनरल फॉर्म ऑफ गॅरन्टी, ३ लेटर ऑफ ॲकनॉलेजमेंट, प्रतिवादी यांना पाठविलेली नोटीस, २ नोटीस मिळाल्याची पावती, कलम ६५–ब प्रमाणे प्रमाणपत्र व खाते उतारा दाखविण्यात आले. कागदपत्र क्र. १ ते ९ वर प्रतिवादींची सही आहे. लेटर ऑफ गॅरन्टीवर प्रतिवादीचे नाव व त्याची सही आहे. कलम ६५–ब प्रमाणपत्र व खाते उता–यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पोस्टाच्या पोहोच पावतीवर पोस्टाचा शिक्का आहे. प्रतिवादीला पाठविण्यात आलेल्या नोटीसवर माझ्या विधिज्ञांची सही व त्यांचा शिक्का आहे. कर्ज मंजुरी अर्ज व ३ लेटर ऑफ ॲकनॉलेजमेंट वर बँक मॅनेजर यांची सही व बँकेचा शिक्का आहे. वरील सर्व कागदपत्रामधील मजकुर आमच्या बँकेतील मुळ रेकॉर्डप्रमाणे खरा व बरोबर आहे. सदरील कागदपत्रे **निशाणी क्र. १४ ते २७** पर्यंत आहे.

**उलटतपास प्रतिवादीर्फे –**

प्रतिवादी व त्यांच्या विधिज्ञ यांना वारंवार पुकारले असता गैरहजर.

उलटतपास नाहीचा आदेश पारीत.

'श्रवणोत्तर स्विकृत'

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ANUPAMA CHANDRASHEKHAR PARSHETTI
Date: 2025.07.15 11:51:07 +0530

**( श्रीमती अनुपमा चं. पारशेट्टी )**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
राहुरी.

दिनांकः १४/०७/२०२५.